# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


दि. २९.०१.२०१६

क्र : मविनिआ/माअअ/०६/२०१६/१३८५

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नं. ८, रुम नं.४,
उल्हासनगर -१

**विषय :- आपला दि. १४ जानेवारी, २०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. १४ जानेवारी, २०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १५ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.-

| अ.क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | खुलासा |
|---|---|---|
| १. | ग्राहक क्र. ०२१५१९०२१५५० या ग्राहकाचा युनिट रेट ११.१५ पाच वर्षांनी वित वितरन कंपनी कल्याण सर्कल-२ ने घेतला आहे रेट १०.६२ पैसे युनिट आहे सदर कारवाई व जास्त घेतलेले पैसे व्याजासह परत करण्यासाठी आपणास दिनांक ०५.१२.२०१५ रोजी अर्ज केला आहे सदर अर्जावर काय कारवाई करण्यात आली याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | सदर अर्ज महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाला दि. ७.०१.२०१६ रोजीच्या पत्रासोबत पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे) |
| २. | सदर विज ग्राहकाचे नियमापेक्षा युनिट दर जास्त घेतले असल्यास व्यापार नियमाप्रमाणे जास्त घेतले तर विज वितरन कंपनीला अर्ज आल्यावर परत करण्यासाठी कोर्टामध्ये किंवा आय. जी. आर. सी, सी. जी. आर. एफ. व एम.ई.रा.सी कडे जाण्याची गरज असल्यास त्याचा जीआरची प्रत मिळावी. | अर्जदाराला नेमके कोणते दस्तावेज पाहिजे याचा स्पष्ट उल्लेख होत नाही. तथापि, आपण वीज देयकांच्या तक्रारी संदर्भात तक्रार करण्यासाठी असलेल्या मविनिआ (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ चे अवलोकन करु शकता. सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपत उपलब्ध आहे. |
| ३. | सदर विज ग्राहकाचे युनिट रेट जास्त घेतला आहे हे ऑर्डरमध्ये गव्हर्नमेंट व वित वितरन कंपनीच्या अधिकाऱ्याच्या लक्षात आले नाही त्याचा भुर्दंड ग्राहकाला लागला व अर्ज दिल्यानंतरही चुक विज वितरन कंपनीची असताना पैसे परत करण्यासाठी गरीब हात मजुरीवाला ग्राहक कोर्टामध्ये जाऊ शकत नाही म्हणून अशा वेळेस शासनाची काय उपययोजना किंवा आदेश दिला जातो त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी | |


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे